**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** म्हसवड **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0045 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/02/2026 14:08 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 07/01/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 07/01/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:47 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:19 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 11/02/2026 **Time (वेळ):** 14:08 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 014 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 11/02/2026 14:08 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** म्हसवड,माण

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल दाजी पाटील

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8308469377

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | महिला पोलीस हवालदार निता नारायण पळे | | | 1. Town/Village (शहर / गाव): म्हसवड पोलीस स्टेशन,Tehsil (तहसील): माण,Police Station (पोलीस ठाणे): म्हसवड,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 11/02/2026.

मी, सुनिल दाजी पाटील वय-36 वर्षे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा मो.नं.8308469377.

समक्ष म्हसवड पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की, दिनांक 07/01/2026 रोजी मला पोलीस उप अधीक्षक राजेश वाघमारे यांनी त्यांना एका तक्रारदाराकडुन लोकसेवकांविरुध्द लाचेची मागणी

केल्या संदर्भातील तक्रार दिनांक 07/01/2026 रोजी सकाळी 07.33 वा चे सुमारास फोनद्वारे प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीवर तात्काळ पुढील कारवाई करणेबाबत पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे यांनी आम्हास आदेशित केले. म्हणुन आम्ही लागलीच तहसील कार्यालय कोरेगाव यांचे कार्यालयातून लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलाविले व सदर पंचाना तहसिल कार्यालय कोरेगाव येथे हजर राहणेचे सुचना दिल्या. त्यानंतर मी व सापळा पथक असे शासकीय वाहन क्रमांक एम.एच. 11 डी.एच.8213 बसलो व वाहन पोहवा ताटे यांना तहसिल कार्यालय कोरेगाव येथे घेणेस सांगितले. तहसील कार्यालय कोरेगाव येथे 09.20 वाजता पोहचलो असता तेथे हजर असणारे पंच 1) स्वप्निल विलास दडस, ग्राम महसुल अधिकारी, हिवरे ता.कोरेगाव जि.सातारा 2) धीरज दत्तात्रय गुरव, ग्राम महसुल अधिकारी, तलाठी कार्यालय देऊर ता कोरेगांव जि.सातारा यांची ओळख करुन घेवुन त्यांना आमची ओळख सांगुन त्यांना एका तक्रारदाराकडुन लोकसेवकांविरुध्द लाचेची मागणी केल्या संदर्भातील तक्रार दिनांक 07/01/2026 रोजी पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांना फोनद्वारे प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीवर तात्काळ पुढील कारवाई करणेबाबत पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे यांनी आम्हास आदेशित केले आहे. त्याप्रमाणे सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित लोकसेवक तक्रारदाराकडे खरोखर लाचेची मागणी करीत आहे किंवा कसे? याबाबत आज दिनाक 07/01/2026 रोजी समक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. तक्रारदार यांना ला.प्र.वि. कार्यालय सातारा येथे येण्यास जमणार नसून ते अप्रतिम हॉल म्हसवड येथे थांबले असल्याने तेथे जावून पुढील कारवाई करणार आहोत. त्यानूसार सदर पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान पंच म्हणून काम करण्यास पंचाची संमत्ती घेवुन आम्ही शासकीय वाहनातुन कोरेगाव येथुन म्हसवड करिता रवाना झालो. त्यानंतर मी पंच व सापळा पथक असे अप्रतिम हॉल म्हसवड येथे 10.50 वाजता पोहचलो असता तेथे एक इसम हजर होता. त्यावेळी मी सदर इसमाची ओळख करुन घेतली असता सदरच्या इसमाने त्यांचे नाव सुरज भिवाजी लोखंडे वय-25 वर्षे, व्यवसाय- फर्निचर कारागिर रा.दिवड ता माण जि.सातारा असे सांगुन ते तक्रारदार असल्याचे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बसणेस सांगुन पंच 1) स्वप्निल विलास दडस, ग्राम महसुल अधिकारी, हिवरे ता.कोरेगाव जि.सातारा 2) धीरज दत्तात्रय गुरव, ग्राम महसुल अधिकारी, तलाठी कार्यालय देऊर ता कोरेगांव जि.सातारा यांची तसेच सापळा पथकातील पोहवा ताटे, राजपुरे, पोशि शिंदे, थोरात, मपोशि गुरव यांची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यावेळी मी तक्रारदार यांना पंच व सापळा पथकासमक्ष त्यांची तक्रार विचारली असता, तक्रारदार यांनी हकीकत सांगितली की, मी दिवड ता.माण जि.सातारा येथील कायमचा रहिवाशी आहे. माझे शिक्षण 8 वी पर्यंत झालेले आहे. मला चांगले प्रकारे लिहीता वाचता येत नाही. परंतु मला सही करता येते. दि.28/12/2025 रोजी माझ्याकडुन अन्नपुर्णा हॉटेल, म्हसवड जवळ अपघात झाला होता म्हणुन माझ्यावर म्हसवड पोलीस ठाणे येथे गुरनं. 06/2026 भा.न्या.सं.कलम 125(ऐ), 125(बी), 281, 324(4),मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 134(ए), 134(बी), 184 प्रमाणे दिनांक 02/01/2026 रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये माझ्याकडे असलेली मारुती सुझुकी कंपनीची ओमणी कार क्रमांक एम.एच 45 एन 6729 ही गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास म्हसवड पोलीस ठाणेतील महिला पोलीस हवालदार निता पळे ह्या करीत आहेत. जप्त करण्यात आलेली ओमणी कार ही इलाही नुरुद्दीन सय्यद रा.दिवड ता माण यांच्या नावावर रजिस्टर असुन ती

गाडी मी नोटरी करुन विकत घेतली आहे परंतु ओमणी कार माझ्या नावावर नाही.

निता पळे यांनी सांगीतलेप्रमाणे मी गुन्ह्याचे तपासकामी दिनांक 05/01/2026 रोजी 11.00 वा म्हसवड पोलीस ठाणे येथे जाऊन निता पळे यांची भेट घेतली. त्यावेळी निता पळे यांनी माझ्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेली ओमनी कार सोडवून देणेसाठी 10,000/- रुपयेची मागणी केली. तसेच बुधवार दिनांक 07/01/2026 रोजी पैसे आणुन दिले तर गुन्ह्यात जप्त असलेली ओमनी कार ही गुरवार दिनांक 08/01/2026 रोजी मला देण्यात येईल असे मला सांगीतले. निता पळे यांना पैसे दिले नाहीत तर त्या माझी गुन्ह्यात जप्त केलेली ओमनी कार सोडणार नाहीत. त्यामुळे मी नाईलाजाने त्यांना लाच रक्कम देण्यास होकार दिला आहे. परंतू त्या मागणी करीत असलेली 10,000/- रुपये लाच रक्कम त्यांना देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

मी दिनांक 07/01/2026 रोजी तपासी अधिकारी महिला पोलीस हवालदार निता पळे यांची म्हसवड पोलीस ठाणे येथे जाऊन समक्ष भेट घेणार असुन त्यांनी केले लाच मागणीबाबत चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान निता पळे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. महिला पोलीस हवालदार निता पळे यांचेत व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार अगर पुर्ववैमनस्य नाही.

मला चांगल्या प्रकारे लिहीता वाचता येत नसल्याने माझा तक्रारी अर्ज माझे सांगणे प्रमाणे पोहवा राजपुरे, ला. प्र.वि सातारा यांनी लॅपटॉपवर टंकलिखित केला आहे. पो नि पाटील यांनी मला माझा तक्रारी अर्ज दोन शासकीय पंचासमक्ष वाचुन दाखविला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

त्यानंतर सदरचे अर्जाचे प्रिंट काढुन त्यावर तक्रारदार, पंच व मी सहया केल्या. तक्रारदार लोखंडे यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे तक्रारदार यांची अपघाताच्या गुन्ह्यात जप्त असलेली ओमनी कार सोडविण्यासाठी लोकसेवक महिला पोलीस हवालदार निता पळे या 10,000/- रुपये लाच मागणी करीत आहेत अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून त्याकामी पंच नंबर 1 म्हणून स्वप्निल विलास दडस व पंच नंबर 2 म्हणून धीरज दत्तात्रय गुरव हे काम करतील असे तक्रारदार व पंचाचे सहमतीने ठरविले.

त्यानंतर दिनांक 07/01/2026 रोजीचे पडताळणीवेळी तक्रारदार सुरज लोखंडे व लोकसेवक निता पळे, पोलीस हवालदार म्हसवड पोलीस स्टेशन यांचेत होणारे लाच मागणी संबंधाने संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व SanDisk कंपनीचे 8 GB कार्ड त्याचे वरील बाजुस SanDisk micro SD HC 8GB व खालील बाजुस KKNBL09/25 MMCO8GBKH30-A8 YB AX215F 2509 MADE IN TAIWAN असे लिहीलेले एक नवीन मेमरीकार्ड दाखविले. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसा चालू-बंद केला जातो त्याचे प्रात्यक्षिकही करून दाखविले व त्यामध्ये नमूद क्रमांकाचे नवीन मेमरी कार्ड घालून ते फॉरमॅट केल्यानंतर त्या मेमरी कार्ड मध्ये व रेकॉर्डरमध्ये कोणतेही संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी तक्रारदार व पंच नं.1 दडस यांना सूचना दिल्या.

त्यानुसार 11.47 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार व पंचांचे निवेदन ध्वनीमुद्रीत केले तो व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील बनियान मध्ये लावून दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे पडताळणी कारवाईसाठी तक्रारदार यांचे दुचाकी क्रमांक एम.एच. 11, सी.एस.7543 गाडीवरून अप्रतिम हॉल, म्हसवड येथुन रवाना झाले.

काही वेळानंतर तक्रारदार व पंच 1 हे तक्रारदार यांचे दुचाकी वरून सापळा पथक थांबले ठिकाणी परत आले तेव्हा मी तक्रारदार सुरज लोखंडे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला ती वेळ 12.19 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 दडस यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे म्हसवड पोलीस स्टेशन, ता. माण, जि. सातारा येथे गेलो.त्यावेळी पिवळा पंजाबी ड्रेस घातलेल्या महिलेने तक्रारदार यांना "ये ना, तिकड नाय, इकड ये ना" असे म्हणुन हाक मारली.त्यावेळी तक्रारदार जावुन त्यांचेशी बोलु लागले. त्यावरुन मला त्या महीला पोलीस हवालदार निता पळे असल्याचे समजले. त्यावेळी तक्रारदार त्यांना "तीच की" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम "ती कागद कुठं हायती? " अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार यांनी "कुठली? असे विचारले, त्यावर पळे मॅडम "ती ह्यानं दिल्याली, काय काय दिल व्हंत" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मी आधार कार्ड, हे ह्याच हे दिलतं" असे म्हणाले त्यावेळी पळे मॅडम यांनी तक्रारदार यांना उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच रकमेबाबत विचारणा केली. त्यावर तक्रारदार "नाय मॅडम, झालं नायती, काय तुम्हाला सांगु, काय तरी करा मॅडम कमी जास्त." असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम तक्रारदार यांना "काय केलं पाहिजे?" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नायती इतकं होतं मॅडम" असे म्हणाले, त्यावर पळे मॅडम यांनी तक्रारदार यांना "किती आणलेत?" असे विचारले, त्यावर तक्रारदार "अं अं.... तासात देतो म्हणलेत पेमेंट देतो म्हणलेत, नंतर करतो" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम "तुझ्या आयचं टकुचं, तासात म्हणतो, आता किती आणलेत? ते दे पहिल्यांदा पटदिशी" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार यांनी "गाडी केव्हा सोडुन द्याल तुम्ही" असे विचारले, त्यावर पळे मॅडम "लगेच देतो उद्याच्याला" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "उद्याच्याला का?" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम यांनी त्यांचेकडील कागद तक्रारदार यांना दाखवुन "ही काय हाय? ही काय हाय?" असे विचारले, त्यावर तक्रारदार "ते गाडीचं हे आहे, आरसी बुक" असे म्हणाले, त्यावर पळे मॅडम यांनी "कोणाच्या नावावर हाय गाडी?" असे विचारले, त्यावर तक्रारदार "इलियास सय्यद" असे म्हणाले, त्यावर पळे मॅडम "इलियास सय्यद, आणि ही लायसन हाय का?" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाय नाय ही माझं आधारकार्ड" असे म्हणाले, त्यावर पळे मॅडम यानी "लायसन कुठं हाय तुमचं" असे तक्रारदार यांना विचारले. त्यावर तक्रारदार लायसन नाही असे म्हणाले, त्यानंतर तक्रारदार व पळे मॅडम यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार बघा काय तरी मॅडम असे म्हणाले त्यावर पळे मॅडम बर काय करणार आहे ते सांग? तु रोज रोज येवु नको, मी तुझी गाडी सोडणार नाही, नाहीतर मी भंगारात जमा करुन टाकेन तिकडं, रोज रोज येवुन डोकं खायचं नाही, काय हात ते एकदाच झटक्यात फटका असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार "करा काय तरी मॅडम" असे म्हणाले त्यावर पळे मॅडम "किती आणलेत, दे लवकर, बस झालं, व्हय किती रुपये आणलेतं?" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार"देतो की मी तुम्हाला, देती की, दहा पंधरा मिनिटात काय पण करुन आणुन देतो." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व पळे मॅडम यांचेत तक्रारदार यांचेवरील दाखल गुन्ह्याबाबत व ओमनी कार सोडवणेबाबत चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार "गाडी ज्याच्या नावावरं हाय, त्याला पण बोलावुन घेतो ना." असे म्हणाले त्यावर पळे मॅडम "बोलवं की मग.. त्याच्यावर दुसरा गुन्हा दाखल करुन टाकते, बिगर लायसन च्या माणसाच्या ताब्यात गाडी दिली कशी म्हणुन, असे पण सांगितल ना तुला आम्ही त्या दिवशी काय असलं ती, कशाला तीनदा तीनदा तीच तीच आकडा विचारतुय,

काय नाय इथं कोण नायती कोण, बोल इथं, इथं सीसीटीव्ही कॅमेरात दिसु दे तु काय म्हणतुयंस ते, जा तु तुझी ती गाडी कोणाच्या नावावर आहे तो येईल मालक जा, हे बघ तुला सोडलाय ना आम्ही, त्याचं काय असेल ते कर, बाकीची लयं लांबड लावु नकोस, जा जा.." असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार "करा की काय तर" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम "अरे तुला जामीन द्यायलाच पाच हजार ...गाडी नाय आम्ही पाच हजारात सोडणार, गाडी नाय पाच हजारात.., अरे तुझ्या कागदपत्राचचं पाच हजार रुपये हुत्याती.., अपघात झालाय केवढा मोठा, ती माणुस मरल आता कराडचं, तुझ्याकडं लायसनच नाय ना, त्यामुळे तुला अटक करावीच लागणार आहे, त्यो मेल्यावनं" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार "काय तरी" असे म्हणाले. तेव्हा पळे मॅडम "दे इकडं ती तुझ्या गुन्ह्यात, गुन्ह्याचं पाच हजार रुपये दे पहिल्यांदा" असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार "बाहेर तर चला.. बाहेर तर चला.. देतो की पाच हजार" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम यांनी बाहेर कशाला? असे विचारले त्यावर तक्रारदार "इथं पेमेंट नाय, पप्पा हायत की बाहेर, बाहेर तर चला, चला की बाहेर, चला की बाहेर" असे म्हणाले. तेव्हा पळे मॅडम तक्रारदार यांना "जा बाहेर जा" असे म्हणाल्या. त्यानंतर मी व तक्रारदार म्हसवड पोलीस स्टेशन मधुन बाहेर आलो व तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन अप्रतिम हॉल, म्हसवड येथे परत आलो. वैगेरे मजकूरची हकिगत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. सदरवेळी मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले ते पंच नंबर 1 व तक्रारदार यांचे हकीकतीशी मिळतेजुळते आहे.

एकंदरीत दिनांक 07/01/2026 रोजी करण्यात आले पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार लोखंडे व महिला पोलीस हवालदार पळे यांची म्हसवड पोलीस स्टेशन येथे समक्ष भेट झाली त्यावेळी महीला पोलीस हवालदार पळे यांनी तक्रारदार यांची गुन्ह्यामध्ये जप्त असलेली ओमणी कार सोडण्यासाठी व अपघाताच्या गुन्ह्यात मदत केली म्हणुन तक्रारदार यांचेकडे पंच नंबर 1 यांचेसमक्ष 5000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतलेची पंचांची व आमची खात्री झालेने सापळा कारवाईचे नियोजन करण्याचे ठरविले.

तक्रारदार लोखंडे यांना महिला पोलीस हवालदार पळे यांनी मागणी केलेली 5000/- रुपये लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 5,000/- रूपये हजर केले. सदर रक्कम कोठून आणली याबाबत तक्रारदार लोखंडे यांना विचारणा केली असता सदर रक्कम ही माझ्या घरखर्चाच्या शिल्लकीतील असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 10 नोटा आहेत. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार यांनी 5,000/- रुपये लाच रकमेच्या नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहुन त्यावर मी व पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर मी पंचास व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरची डबी व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन, अँथ्रासिन पावडर ज्या वस्तुस अगर हातास लागलेली असते ती वस्तु अगर हात लाईटचे प्रकाशात पाहिल्यास अँथ्रासिन पावडर लागल्याचे दिसत नाही. परंतु अंधार करून अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिलेस फिक्कट निळसर चकाकी दिसुन येते असे त्याचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगुन तक्रारदार यांनी हजर केलेली 5,000/- रुपये लाच रक्कमेस शासकीय वाहन एम.एच. 11 डी.एच. 8213 ची दारे व खिडक्या लावून काळया रंगाच्या कापडाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून

अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, त्यावर कसलीही चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर मी कापसाचा बोळा, सफेद कागद व अँथ्रासिन पावडरची डबी असे पोकॉ थोरात यांच्याकडे देवून, तक्रारदार यांनी हजर केलेल्या 5,000/- रूपये लाच रक्कमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे त्यांनी वाहनाचे मधल्या सीटवर सफेद कागदावर नोटा ठेवून त्यास अँथ्रांसिन पावडर कापसाच्या बोळयाने नोटांचे दोन्ही बाजुस लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोकॉ थोरात यांनी लोकसेवक मपोहवा पळे यांना देणेसाठीची 5,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांच्या शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशामध्ये अलगद ठेवली. त्यानंतर पो.कॉ.थोरात यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. तसेच सापळा कारवाईचे चित्रीकरण हे पोहवा ताटे यांचे मोबाइलमध्ये करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे मोबाइल फोनमध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार लोखंडे व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईवेळी तक्रारदार लोखंडे व लोकसेवक मपोहवा पळे मॅडम यांचेत होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी माझेकडील सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळीच्या संभाषणाची 01 फाईल सेव्ह असुन तेच मेमरीकार्ड पुढे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगुन तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंचांचे व तक्रारदार यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत केले. ती वेळ 13.34 वा.चे सुमाराची होती. सदर निवेदन घेताना पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोन मध्ये व्हीडीओ रेकॉर्डींग केले आहे.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील बनियान मध्ये लावून दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे सापळा कारवाईसाठी तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरून रवाना झाले ती वेळ 13.41 वा. चे सुमाराची होती. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे पाठीमागून शासकीय वाहनामधून म्हसवड पोलीस स्टेशनचे जवळ येवुन वाहन उभे करून कोणास संशय येणार नाही अशा रितीने आडोशास सापळा लावुन थांबुन राहिले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नंबर 1 पोलीस स्टेशनच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला नाही. तेव्हा म्हसवड ते इंजबाव जाणारे रोडवर मी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.19 वा ची होती. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं 1 यांना अप्रतिम हॉल म्हसवड येथे जावुन थांबण्याच्या सुचना दिल्या त्यानंतर मी व सापळा पथक शासकीय वाहनातुन अप्रतिम हॉल म्हसवड येथे आलो. तेथे येवुन थांबलेल्या पंच नंबर 1 यांचेकडे मी समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 दडस यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकीवरुन म्हसवड पोलीस स्टेशन येथे गेलो. त्यावेळी मी व तक्रारदार पळे मॅडम बसत असलेल्या ठिकाणी गेलो असता तेथे पळे मॅडम हजर नव्हत्या. त्यावेळी तक्रारदार यांनी तेथे उपस्थित असलेल्या इसमास "पळे मॅडम हायत्या" असे विचारले असता "बाहेर गेलेत, खाली गेलेत गावात, येतील आता, काय हाय" असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी काय नाय असे म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचेकडील मोबाईल नंबर 9604517074 वरुन पळे मॅडम यांचा मोबाईल नंबर 9764236308 वर फोन केला असता पळे मॅडम यांनी त्या बाहेर आल्या असल्याचे तक्रारदार यांना सांगीतले. त्यामुळे मी व तक्रारदार म्हसवड पोलीस स्टेशन समोरील बाकड्यावर पळे मॅडम यांची वाट पाहत बसुन राहीलो. थोडा वेळ वाट

पाहील्यानंतर पळे मॅडम न आल्याने तक्रारदार यांनी पुन्हा पळे मॅडम यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता पळे मॅडम हा आलुय आलुय असे म्हणाल्या. पळे मॅडम या पोलीस स्टेशन समोर आल्यानंतर मी, तक्रारदार यांचेसोबत पुन्हा पोलीस स्टेशन मध्ये गेलो तेव्हा पळे मॅडम यांनी तक्रारदार यांना "तु कशाला आलाय" असे विचारले. त्यावर तक्रारदार "तीच की गाडीच" असे म्हणाले. त्यावर पळे मॅडम "आरं गाडीला ती आर.आय.डी. भरायला लागतं, परत ती आर.टी.ओ. तपासणी होती, परत ती दुसरी आमची टु व्हीलरची जी हाय का नाय त्याची कागद, तुझी कागद, लायसन बियसन द्या ना, मग ती आर.टी.ओ. ला कागद जात्यात आणि मग आर.टी.ओ. येतात, अन् आर.टी.ओ. तपासणी झाल्यावर मग गाडी देवुन टाकणार, गाडी अशी नाही भेटत लगेच दादा अपघातातली, रोज रोज तुला सांगितलयं ना येवु नको पोलीस स्टेशनला, कशाला येतोय रोज रोज, आर.टी.ओ तपासणी झाल्यानंतर तुला बोलवतो आम्ही, मग तु घेवुन जा, तुझं लायसन आण आणि त्या गाडी मालकाची कागदं घेवुन ये फक्त.. तुझं दिलाय ना तुझा तो फोटो अन ती ही ती.. मग रोज रोज कशाला येतोय ? जा चल, जा तु, तीनदा तीनदा आण गाडी मालकाला घेवुन ये. रोज रोज रोज.. एकदा सांगितलेल समजत नाय का तुम्हाला, आर.टी.ओ तपासणीला खाडे दादांचा एक गुन्हा माझा एक गुन्हा, ते आम्ही आय.आर.डी पला भरलेला हाय गुन्हा, त्यासाठी लायसन लागतयं, तुझं लायसन, तुझ्या मालकाची कागदपत्र, ती जी टु व्हीलर वाला आहे ना, तो आता अजुन आय.सी. यु मध्ये हाय, तो आल्यानंतर त्याच लायसन, आणि त्याच्या गाडीची कागदपत्र, ती आपण आर.टी.ओ ला पाठवतो आणि मग आर.टी.ओ. तपासणी झाल्यावर तुला बोलावुन घेतो आणि तुझी गाडी देवुन टाकतो. आम्हाला काय इथं ठेवायची हायतं का? मागं दोनशे गाड्या हायतं, जा आता लय लांब नायस तु, तीनदा तीनदा येवुन विचारु नको" असे म्हणाल्या. पळे मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारली नाही म्हणुन मी व तक्रारदार पुन्हा म्हसवड पोलीस ठाणे येथुन बाहेर आलो. त्यानंतर मी तक्रारदार लोखंडे यांना हकीकत विचारणा केली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतेजुळते असल्याची खात्री केली.

दिनांक 07/01/2026 रोजीच्या सापळा कारवाईवेळी महीला पोलीस हवालदार पळे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारली नसल्याने दिनांक 07/01/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्याचे पंचांचे ,आमचे व तक्रारदार यांचे सहमतीने ठरविण्यात आले तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन येणेबाबत निरोप आल्यानंतर पुन्हा सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. सापळा कारवाई वेळी वापरण्यात आलेल्या नोटा तक्रारदार यांना बदलुन दिल्या. त्यानंतर आम्ही 16.00 वाजता म्हसवड येथुन रवाना होवुन 17.55 वाजणेचे सुमारास ला.प्र.वि सातारा कार्यालयात दाखल झालो. त्यानंतर पडताळणी व सापळा पंचनामाबाबतचे स्क्रीप्ट व पंचनामा तयार करुन त्यावर मी व पंचानी सह्या केल्या. पंचनामा कार्यवाही ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथे 21.00 वाजता पूर्ण करण्यात आली आहे.

दिनांक 19/01/2026 रोजी तक्रारदार लोखंडे यांना संपर्क केला असता त्यांनी म्हसवड पोलीस स्टेशन येथे गुन्हयामध्ये जप्त असलेली ओमणी कार गाडीचे मुळ मालक इलाही नुरुद्दीन सय्यद यांना परत देण्यात आली असुन ती त्यांनी मला परत दिली असल्याचे सांगितले आहे. तक्रारदार यांचे काम झालेने त्यांना महिला पोलीस हवालदार पळे या पुन्हा लाचेची मागणी करतील असे वाटत नसल्याने

व तक्रारदार यांना कोणीही लाच रक्कमेबाबत हस्ते परहस्ते निरोप दिला नसल्याने लोकसेवक निता पळे या लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नाही असे सांगत असल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे.

तरी दिनांक 07/01/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वेळी यातील मुळ तक्रारदार सुरज भिवाजी लोंखडे वय-25 वर्षे, व्यवसाय- फर्निचर कारागिर रा.दिवड ता माण जि.सातारा हे म्हसवड पोलीस ठाणे  येथे गेल्यानंतर तक्रारदार लोखंडे व महिला पोलीस हवालदार पळे यांची म्हसवड पोलीस स्टेशन येथे समक्ष भेट झाली त्यावेळी महीला पोलीस हवालदार पळे यांनी तक्रारदार यांची गाडी सोडवण्यासाठी व गुन्ह्यात मदत केली म्हणुन तक्रारदार यांचेकडे पंच नंबर 1 यांचेसमक्ष 5000/- रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन येण्यास सांगुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे म्हणुन लोकसेवक महिला पोलीस हवालदार निता नारायण पळे म्हसवड पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार सुरज लोखंडे यांचेकडुन लोकसेवा प्रदान करण्याकरीता अयोग्यरित्या बेकायदेशीर परितोषण स्विकारण्याच्या प्रयत्न केला असल्याने त्यांचेविरुद्ध माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** AKSHAY APPA SONAWANE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** AKSHAY APPA SONAWANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** API

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**